# कार्यालयीन टिपणी

जिल्हा मानव विकास समिती, यवतमाळ

दि.२८ फेब्रुवारी, २०१७

**विषय:- मानव विकास कार्यक्रमांतर्गत**
**गौण व वनौपजांचा उपभोग घेण्यासाठी बीज भांडवल म्हणून एकवेळचे अर्थसहाय उपलब्ध करुन देणे.**

नियोजन विभाग, शासन निर्णय क्र:- माविमि-२०१०/प्र.क्र.८१/का.१४१८, दि.१९ जुलै, २०११ अन्वये मानव विकास कार्यक्रमाची व्याप्ती वाढविणे व मानव विकासावर आधारित योजना राबविणे या कार्यक्रमाखाली जिल्हयाचा मानव विकास निर्देशांक उंचावण्याकरिता मानव विकास कार्यक्रम यवतमाळ जिल्यात राबविण्यात येत आहे.

राज्यातील पंचायत क्षेत्र विस्तार कायदा, १९९६ (पेसा) आणी अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम,२००६ सारख्या कायद्यातील तरतूदीनुसार अनुसूचित क्षेत्रांतर्गत गौण वनोपजे गोळा करण्यासाठी त्याचप्रमाणे लघुपाणीसाठयातील मासेमारी करता यावी यासाठी संबंधित ग्रामसभेला अथवा अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वननिवासी यांना मानव विकास कार्यक्रमांतर्गत सध्या राबविण्यात येत असलेल्या योजनांव्यतिरिक्त उत्पन्नवाढ योजनांमध्ये **गौण व वनौपजांचा उपभोग घेण्यासाठी बीज भांडवल म्हणून एकवेळचे अर्थसहाय उपलब्ध करुन देणे.** या योजनेचा नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.माविका-२०१४/प्र.क्र.१२/का.१४१८ दि.२१ ऑगस्ट, २०१४ अन्वये यवतमाळ जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रतील झरीजामणी, आर्णी, घाटंजी केळापूर(पांढरकवडा) व मारेगांव या तालुकाचा समावेश करण्यात आला आहे. सदर पाच तालुक्यामध्ये शासनाच्या निकषानुसार योजना जिल्हा मानव विकास समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांचे मार्फत राबविण्यात येते.

**योजनेची व्याप्ती :-** राज्यातील पंचायत क्षेत्र विस्तार कायदा, १९९६ (पेसा) आणी अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम,२००६ सारख्या कायद्यातील तरतूदीनुसार अनुसूचित क्षेत्रांतर्गत गौण वनोपजे गोळा करण्यासाठी त्याचप्रमाणे लघुपाणीसाठयातील मासेमारीचे हक्क वापरण्यात येत आहेत किंवा वापरले जाणार आहेत, अशा गावांच्या ग्रामसेभेला अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते.

**योजनेची कार्यपध्दती:-** वनहक्क कायदा व पेसा अंतर्गत गौण वनौपजावर हक्क प्रस्थापित करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या गावपातळीवरील संविधानिक समित्यांना हे अर्थसहाय अनुज्ञेय असेल. तसेच या योजनेंर्गत ज्या गांवाना लाभ घ्यावयाचा आहे,अशा गावांतील ग्रामसभांनी त्यांनी करावयाचा उपक्रमांचा एक सविस्तर प्रस्ताव तयार करावा.सदर प्रस्तावासोबतच ग्रामसभेच्या निव्वळ नफ्याचा भाग शासनाकडून मिळणा-या अर्थसहातून उभारलेल्या बीज भांडवलात जमा करण्याची तयारी असल्याचा ठराव जोडणे आवश्यक असेल.त्याचप्रमाणे, गौण वनोपजाचे वापर करतांना वनौपजांचे संवर्धन करण्याची तयारीही ग्रामसभेने लेखी स्वरुपात जिल्हाधिकारी यांना गट विकास अधिकारी याच्या माध्यमातून अग्रेषित करावी.

**गावाची निवड:-** सध्या राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील जवळपास २८०० ग्रामपंचायती असून त्यामध्ये सूमारे ५,९०० गावांचा समावेश होतो. या क्षेत्रांना पेसा कायदा तसेच वनहक्क कायद्याचे सर्व अधिकारी लागू आहेत. पेसा कायद्यामध्ये समाविष्ठ ५९ गटा पैकी ४५ गटांचा समावेश हा मानव विकास कार्यक्रमांतर्गत होतो.सदर ४५ गटातील अनुसूचित क्षेत्रातील गावांना ही योजना लागू राहील.

**योजनेअंतर्गत अनुज्ञेय अर्थसहाय:-** गौण वनौपजे गोळा करण्यासाठी तसेच मासेमारीसाठी देण्यात येणारे अर्थसहाय खालीलप्रमाणे अनुज्ञेय आहेत.

| अ.क्र. | बाब | अनुज्ञेय अर्थसहाय (रुपये लाखात) |
|---|---|---|
| १ | ५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेली गावे परंतू जिथे तेंदू किंवा बांबू व्यतिरिक्त इतर गौण वनोपजांचा तसेच लघु पाणीसाठयातील मासेमारीच्या व्यवसायासाठी | २ लक्ष |
| २ | ५०० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेली गावे परंतू जिथे तेंदू किंवा बांबू व्यतिरिक्त इतर गौण वनोपजांचा तसेच लघु पाणीसाठयातील मासेमारीच्या व्यवसायासाठी | ४ लक्ष |
| ३ | ५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेली गावे परंतू जिथे तेंदू किंवा बांबू व इतर गौण वनौपजांचा तसेच लघु पाणी-साठयातील मासेमारीच्या व्यवसायासाठी | ४ लक्ष |
| ४ | ५०० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेली गावे परंतू जिथे तेंदू किंवा बांबू व इतर गौण वनौपजांचा तसेच लघु पाणी-साठयातील मासेमारीच्या व्यवसायासाठी | ८ लक्ष |

मानव विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये गौण वनौपज गौळा करण्यासाठी खलीलप्रमाणे निधी वितरण करण्यात आले आहे.

| अ.क्र. | अनुसूचित क्षेत्रातील तालुक्याचे नाव | गाव/वाडी/पाडयांची संख्या | | | प्रशासकीय मान्यता (रु.लाखात ) | | | वितरीत निधी (रु.लाखात) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | २०१६-२०१७ | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | २०१६-२०१७ | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | २०१६-२०१७ |
| १ | मारेगांव | ०३ | १२ | ०२ | १२.०० | ९२.०० | १६.०० | १२.०० | ९२.०० | १६.०० |
| २ | पांढरकवडा | ०२ | २२ | ६४ | १२.०० | ११८.०० | ३५६.०० | १२.०० | ११८.०० | ३५६.०० |
| ३ | आर्णी | ०२ | ०५ | ० | १२.०० | ३२.०० | ०.०० | १२.०० | ३२.०० | ०.०० |
| ४ | घाटंजी | ०३ | १९ | ०६ | १२.०० | १५२.०० | ४०.०० | १२.०० | १५२.०० | ४०.०० |
| ५ | झरीजामणी | ०२ | ०७ | ० | १२.०० | ५६.०० | ०.०० | १२.०० | ५६.०० | ०.०० |
| | | १२ | ६५ | ७२ | ६०.०० | ४५०.०० | ४१२.०० | **६०.००** | **४५०.००** | **४१२.००** |

यापूवी दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजी उपरोक्त माहिती जिल्हयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

आता खालीलप्रमाणे माहिती जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, यवतमाळ यांनी जिल्हयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावी.

| अ.क्र. | अनुसूचित क्षेत्रातील तालुक्याचे नाव | गाव/वाडी/पाडयांची संख्या | प्रशासकीय मान्यता (रु.लाखात ) | वितरीत निधी (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|
| | | २०१६-२०१७ | २०१६-१७ | २०१६-२०१७ |
| | घाटंजी | ४ | २२.०० | २२.०० |
| | झरीजामणी | ६ | ३६.०० | ३६.०० |
| | | १० | ५८.०० | ५८.०० |

D:\MANIK JADHAV\PRESS NOTE 2016-17.DOCX13

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा मानव विकास समिती
यवतमाळ